**तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती (स्वायत्त)**

# मराठी विभाग

# Question Bank

**(शैक्षणिक वर्ष २०१९–२०)**

**द्वितीय सत्र**

**विषय :– मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स.१६०० ते १८१८)**

---

**वर्ग :– एम. ए. भाग १** **पेपर क्रमांक :– २**

**विषय कोड नं. :–MAR 4102** **–प्रा. मुक्ता राजेंद्र आंभेरे**

---

## प्रश्नांचे स्वरूप

**अ) वस्तुनिष्ठ प्रश्न –**

१. समर्थ रामदासांनी पुढीलपैकी कोणत्या स्वरूपाची रचना लिहिली नाही?

अ) भूपाळया ब) श्लोक

क) स्तोत्र ड) गौळणी

२. संत ज्ञानेश्वरांनी रचलेल्या भागवत संप्रदायाच्या इमारतीचा कळस होण्याचे भाग्य कोणास मिळाले?

अ) संत एकनाथ ब) संत तुकाराम

क) संत गोरा कुंभार ड) संत नामदेव

**३.** अणूरेणीया थोकडा........... हा सुप्रसिद्ध अभंग कोणाचा आहे?

अ) संत सावता माळी ब) संत चोखामेळा

क) संत नामदेव ड) संत तुकाराम

**४.** प्राचीन मराठी साहित्यातील अखेरचे प्रमुख वारकरी संत असे कोण आहेत?

अ) संत ज्ञानदेव ब) संत रामदास

क) संत नामदेव ड) संत तुकाराम

**५.** संत रामदासांचे संपूर्ण विचारधन कोणत्या एका ग्रंथात एकवटले आहे?

अ) करूणाष्टके ब) मनाचे श्लोक

क) दासबोध ड) रामायणे

६. मनाचे श्लोक यांची रचना कोणत्या वृत्तात आहे?

अ) भुजंगप्रयात ब) मात्रावृत्त

क) आर्यावृत्त ड) अक्षरगणवृत्त

७. समर्थ रामदासांच्या शिष्येचे नाव सांगा.

अ) संत बहिणाबाई ब) संत जनाबाई

क) संत वेणाबाई ड) संत कान्होपात्रा

८. 'भार्गवीवारूणी' विद्येचा दानाचा उल्लेख वामनपंडितांच्या कोणत्या ग्रंथात आला आहे?

अ) यथार्थदिपिका ब) निगमसार

क) पंचसुधा ड) समश्लोकी टिका

९. पंडित कवींचे प्रातिनिधीक कवी म्हणून कोणास ओळखले जाते?

अ) रघुनाथपंडित ब) मोरोपंत

क) वामनपंडित ड) श्रीधर

१०. 'बिल्हणचरित्र' हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) सामराज ब) विठ्ठल बीडकर

क) नागेश ड) श्रीधर

११.प्राचीन मराठी वाङ्मयात कोणत्या ग्रंथाचा उल्लेख 'शुद्ध प्रेमकाव्य' असा केला आहे?

अ) सीतास्वयंवर ब) द्रोपदीस्वयंवर

क) दमयंतीस्वयंवर ड) रूक्मिणीस्वयंवर

१२. कोणत्या कवीने एकनाथांच्या लोकशिक्षणाचे कार्य पुढे चालविले?

अ) रघुनाथपंडित ब) मोरोपंत

क) वामनपंडित ड) श्रीधर

१३. आज्ञापत्राचा कर्ता कोण?

अ) कृष्णाजी अनंत सभासद ब) मल्हार रामराव चिटणीस

क) दत्ताजी त्रिमल वाकेनिवीस ड) रामचंद्र अमात्य

१४. कोणत्या कवीचा एक यशस्वी किर्तनकार आणि पंडित कवी असा लौकिक होता?

अ) मध्वमुनीश्वर ब) सामराज

क) अमृतराय ड) कृष्णदयार्णव

१५. प्राचीन मराठी साहित्यात सर्वाधिक चरित्रे लिहिणारा ग्रंथकार कोण आहे?

अ) निरंजन माधव | ब) अमृतराय
क) कचेश्वर ब्रम्हे | ड) महिपतीबुवा ताहराबादकर

१६. रचनाकाळाच्या दृष्टीने सर्वात जुनी बखर कोणती?
अ) सभासदाची बखर ब) पानीपतची बखर
क) महिकावतीची बखर ड) भाऊसाहेबाची बखर

१७. 'सुंदरा मनामध्ये भरली....' ही सुप्रसिद्ध लावणी कोणी लिहिली?
अ) अनंतफंदी ब) रामजोशी
क) सगनभाऊ ड) होनाजी बाळा

१८. पंडिती परंपरेतील सर्वश्रेष्ठ व काळाच्या दृष्टीने शेवटचे कवी कोण?
अ) वामनपंडित ब) रघुनाथपंडित
क) निरंजनमाधव ड) मोरोपंत

१९. समर्थ रामदासांचे समाधीस्थान कोठे आहे?
अ) सज्जनगड ब) सिंहगड
क) प्रतापगड ड) रायगड

२०. 'शनिमाहात्म' या ग्रंथाचा कर्ता कोण?
अ) श्रीधर ब) अमृतराय
क) तात्याजी महिपती ड) निरंजनमाधव

२१. श्रीहर्षाच्या नैषध काव्यावर आधारित रघुनाथ पंडितांनी कोणते स्वयंवरकाव्य लिहिले?
अ) सीतास्वयंवर ब) द्रोपदीस्वयंवर
क) दमयंतीस्वयंवर ड) रूक्मिणीस्वयंवर

२२. श्रीरामाची उपासना कोणत्या संप्रदायात केली जाते?
अ) महानुभाव संप्रदाय ब) नाथ संप्रदाय
क) वारकरी संप्रदाय ड) समर्थ संप्रदाय

२३. कोणत्या मराठी ग्रंथांना मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप असे म्हटले जाते?
अ) बखर ब) लावणी
क) पोवाडा ड) आख्याने

२४. 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी.....' ही मारूतीची आरती कोणी लिहिली?
अ) संत रामदास ब) संत एकनाथ

क) संत ज्ञानेश्वर ड) संत नामदेव

२५. कटाव आणि फटके रचणारा शाहिर कोण?

अ) शाहिर परशराम ब) शाहिर अनंतफंदी

क) शाहिर होनाजीबाळा ड) शाहिर रामजोशी

**ब) एका वाक्यात उत्तरे –**

१. संत तुकाराम इश्वरप्राप्तीचा सर्वश्रेष्ठ मार्ग कोणता मानतात?

२. संत तुकारामांच्या शिष्येचे नाव काय होते.

३. 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे । पक्षीही सुस्वरे आळविती' या अभंगाचा भावार्थ सांगा.

४. संत तुकारामांचे कोणतेही दोन सुभाषितवजा अभंग सांगा.

५. कोणत्या संताने समाजाला प्रपंचविज्ञान शिकविले?

६. समर्थ संप्रदायाला आणखी कोणकोणत्या नावाने ओळखले जाते?

७. आनंदवनभुवन व परचक्रनिरूपण ही दोन स्फुट प्रकरणे कोणी लिहिली?

८. खालील ओवी पूर्ण करा.

'पहिले ते हरिकथा निरूपण ........................................

..............................................................................

९. पंडिती काव्य म्हणजे काय?

१०. पंडित काव्याचे प्रकार सांगा.

११. काव्यलेखनासाठी पंडितांनी कोणकोणत्या संस्कृत ग्रंथांचा आधार घेतला?

१२. वामन पंडिताच्या पंचसुधांची नावे सांगा.

१३. श्रीधर पंडितांच्या कोणत्याही दोन ग्रंथांची नावे सांगा.

१४. प्राचीन मराठी कवितेत कोणते तीन प्रमुख प्रवाह दिसून येतात?

१५. शाहिरी कवितेत प्रामुख्याने कोणत्या दोन रसांची उधळण दिसून येते?

१६. पंडिती काव्याची कोणतीही दोन वैशिष्टे सांगा.

१७. पेशवाईच्या काळात कोणकोणते रंजनपर काव्यप्रकार उदयास आले?

१८. 'पंडित व शाहिरी कवितेतील संधीकाल' असे कोणाच्या कवितेच्या संदर्भात म्हटले जाते?

१९. बखर म्हणजे काय? ते सांगा.

२०. शाहिरी वाङ्मयाचे दोन प्रकार कोणते?

२१.	‘घन:शाम सुंदरा…….’ ही सुप्रसिद्ध भुपाळी कोणी लिहिली?
२२.	बखर वाङ्मयाची उत्पत्ती कोणत्या हेतूने झाली?
२३.	कोणत्याही दोन शिवपूर्वकालीन बखरींची नावे सांगा.
२४.	लावणी व पोवडा यामध्ये मुख्य फरक कोणता आहे?
२५.	संस्कृत महाकाव्याचे आदर्श समोर ठेऊन लेखन करणारे कवी कोण आहेत?

**क) टीपा द्या –**

१. समर्थ संप्रदाय
२. दासोपंत
३. कलाकवी मुक्तेश्वर
४. संत तुकारामांचे सामाजिक कार्य
५. ‘शिवलीलामृत’
६. ‘यथार्थदिपिका’
७. रामदास आणि राजकारण
८. दमयंतीस्वयंवर
९. अनंतफंदीचे फटके
१०.	‘हरिवरदा’
११.शाहिर होनाजीबाळा
१२.	बखर : ऐतिह्य वृत्तकथन
१३.	सभासदाची बखर
१४.	पंडित कवींच्या काव्याचे वेगळेपण
१५.	तुकारामांचे उपदेशपर अभंग

**ड) लघुत्तरी प्रश्न –**

१. समर्थ रामदासांच्या मनाचे श्लोकांचे वैविध्य स्पष्ट करा.
२. ‘संत रामदासांनी लोकांना प्रयत्नवाद शिकविला’ या विधानाची चर्चा करा.
३. बखरींचे वर्गीकरण करून त्यांचे स्वरूप सांगा.
४. कवी मोरोपंतांच्या काव्यलेखनाची वैशिष्टे सांगा.
५. संत तुकारामांच्या अभंगातील सामाजिकता स्पष्ट करा.

६. कवी श्रीधर यांच्या ग्रंथलेखनाचे वेगळेपण सांगा.
७. शाहिरी वाङ्मयाचे प्रकार स्पष्ट करा.
८. वामनपंडितांच्या पंचसुधा कोणकोणत्या आहेत? चर्चा करा.
९. संत तुकारामांच्या अभंगांचे स्वरूप स्पष्ट करा.
१०. पंडित कवींच्या काव्यातील सामाजिक स्थिती उदाहरणासह स्पष्ट करा.
११. 'बखर म्हणजे गद्याच्या स्वतंत्र शैलीचा विलास' या विधानाचे स्पष्टीकरण करा.
१२. पेशवेकालीन बखरींचे स्वरूप सांगा.
१३. 'शाहिरी वाङ्मय म्हणजे पोवाडा व लावणी या जोडप्याचा संसार होय' असे का म्हटले जाते?
१४. अनंतफंदींच्या फटक्याचे सामाजिक व वाङ्मयीनदृष्टया मुल्यमापन करा.
१५. लावणीची उत्पत्ती स्पष्ट करा.
१६. मोरोपंतांच्या आर्याभारतचे स्वरूप उलगडून दाखवा.
१७. सुश्लोक वामनाचा या विधानाची चर्चा करा.
१८. संत वेणाबाई यांच्या अभंगांचा परामर्श घ्या.
१९. संत तुकारामांच्या मानसिक युद्धाचा आलेख कोणत्या अभंगांतून दिसून येतो?
२०. बखर वाङ्मयाच्या भाषाशैलीचे वेगळेपण स्पष्ट करा.
२१. 'बहिणी फडकती ध्वजा' या विधानाचा परामर्श घ्या.
२२. तुकारामांच्या अभंगांतील वैचारिकता स्पष्ट करा.
२३. पेशवेकालीन सामाजिक परिस्थितीचे चित्रण लावणीमध्ये कशा प्रकारे आले आहे?
२४. सोळाव्या शतकातील बदललेल्या राजकीय परिस्थितीचा आढावा घ्या.
२५. भाऊसाहेबाच्या बखरीचे स्वरूप उलगडून दाखवा.

**ई) दीर्घोत्तरी प्रश्न –**

१. संत तुकारामांच्या काव्यनिर्मितीच्या प्रेरणा सांगून त्यांच्या अभंगनिर्मितीचे स्वरूप स्पष्ट करा.
२. इ.स. १६०० ते १८१८ या कालखंडातील प्राचीन मराठी साहित्याच्या प्रेरणा व प्रवृत्तींचा आढावा घ्या.
३. संत आणि समर्थ अशी रामदासांच्या व्यक्तिमत्वाची दोन रूपे आहेत – स्पष्ट करा
४. पंडिती काव्याची वैशिष्टे सांगून पंडिती काव्यामधील सामाजिकता स्पष्ट करा.
५. पंडित संप्रदायातील प्रमुख पंडित कवींचा आढावा घ्या.

६. बखर वाङ्मयाची व्युत्पत्ती सांगून बखर लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

७. शाहिरी वाङ्मय म्हणजे काय ते सांगून शाहिरी वाङ्मयाचे वेगळेपण स्पष्ट करा.

८. प्रमुख शाहिर कवींच्या शाहिरी वाङ्मयाचा परामर्श घ्या.

९. बखर म्हणजे काय? ते सांगून बखरींचे वाङ्मयीन व ऐतिहासिक महत्त्व सांगा.

१०. संत, पंत आणि तंत यांचे वाङ्मयाच्या इतिहासातील योगदान सांगा.

********************************